प्रेस नोट दि. २३.०७.२०२६ ला.प्र.वि.सांगली युनिट

आरोपी लोकसेविका १) श्रीमती वर्षा शंकर कदम, वय-४० वर्षे, पद-ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली रा.खटाव ता.मिरज जि.सांगली व आरोपी लोकसेवक २) श्री. शरद दत्तात्रय चौगुले, वय-४० वर्षे, पद- क्लार्क, रा. सिध्देवाडी खंडेराजुरी रोड, पाटील वस्ती, गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली, ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ९५,०००/- रूपये लाचेची मागणी केलेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई..

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक	**सांगली**
पोलीस स्टेशन	मिरज ग्रामीण पोलीस ठाणे, जि.सांगली
गुन्हा नोंद क्रमांक व कलम	गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे.
तक्रारदार	पुरुष वय २८ वर्षे
आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय	१) श्रीमती वर्षा शंकर कदम, वय-४० वर्षे, पद-ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली रा.खटाव ता.मिरज जि.सांगली २) श्री. शरद दत्तात्रय चौगुले, वय-४० वर्षे, पद- क्लार्क, रा. सिध्देवाडी खंडेराजुरी रोड, पाटील वस्ती, गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली, ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली.
पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक	दि. १७.०६.२०२६ रोजी १,२८,०००/- रूपये ची मागणी करुन तडजोडीअंती ९५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले.
सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम	निरंक
सापळा कारवाई दिनांक व ठिकाण	निरंक
थोडक्यात हकीकत	यातील तक्रारदार यांनी ग्रामपंचायत गुंडेवाडी येथे लागणारे आवश्यक साहित्य पुरविलेचे प्रलंबित बिल मंजूर करण्यासाठी गुंडेवाडी ग्रामपंचायत येथील ग्रामविकास अधिकारी श्रीमती कदम व कार्यालयात काम करणारा चौगुले यांनी त्यांचेकडे १,२८,०००/- रूपये लाचेची मागणी केली बाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दिनांक १७/०६/२०२६ रोजी सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिला होता. तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार दि. १७/०६/२०२६ रोजी पडताळणी कारवाई केली असता, पडताळणी कारवाईमध्ये लोकसेविका श्रीमती वर्षा शंकर कदम, वय-४० वर्षे, पद-ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली व लोकसेवक श्री. शरद दत्तात्रय चौगुले, वय-४० वर्षे, पद- क्लार्क, ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार यांचे ग्रामंपचायत कार्यालय गुंडेवाडी येथे लागणारे आवश्यक साहित्य पुरविलेचे बिल काढलेचे मोबदल्यात व प्रलंबित बिल काढण्यासाठी, लोकसेविका श्रीमती वर्षा शंकर कदम, ग्रामविकास अधिकारी गुंडेवाडी यांनी स्वतः करीता व लोकसेवक शरद दत्तात्रय चौगुले, क्लार्क ग्रामपंचायत कार्यालय गुंडेगावडी यांनी स्वतःकरीता व मॅडम करीता तक्रारदार यांचेकडे १,२८,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती आधी २८ हजार रूपये व नंतर आणखीन ५ हजार रूपये असे एकुण ३३ हजार रूपये कमी करून ९५,०००/- रूपये लाचेची मागणी करून स्वतःचा आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला आहे त्या अनुषंगाने लोकसेविका श्रीमती वर्षा शंकर कदम, वय-४० वर्षे, पद-ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली रा.खटाव ता.मिरज जि.सांगली व लोकसेवक श्री. शरद दत्तात्रय चौगुले, वय-४० वर्षे, पद- क्लार्क, रा. सिध्देवाडी खंडेराजुरी रोड, पाटील वस्ती, गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली, ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली यांचेविरूध्द मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे.
तपास अधिकारी	श्री. योगेश चव्हाण, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. सांगली
मार्गदर्शन अधिकारी	पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.
सापळा पथक	श्रीमती यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, तसेच पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, विना जाधव, अजित पाटील, चंद्रकांत जाधव, पोपट पाटील, उमेश जाधव, सलीम मकानदार, ऋषिकेश बडणीकर, प्रकाश जाधव, सुदर्शन पाटील, मनोज निळकंठ, चालक विठ्ठलसिंग रजपूत,

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४, व्हॉट्स अॅप व मोबाईल नंबर ९४०४०४१०६४ वर संपर्क साधावा.

(सही) 23.7.26

श्रीमती यास्मीन शरीफ इनामदार
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
सांगली.

Scanned with OKEN Scanner